महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार

## Government Medical College, Nandurbar

Civil Hospital Campus, Sakri Road - 425412, M.S. (INDIA)

Email- deangmcnandurbar@gmail.com Ph.02564-210444 website:-http://gmcnandurbar.com

जा.क्र.शावैमनं/खरेदी विभाग/दरपत्रक/ 128 /२०२५ दिनांक:-07/०१/ २०२५

**दरपत्रक**

प्रति,

१.

२.

३.

४.

५.

**विषय :- दरपत्रक मोहोर बंद लिफाफा सादर करणे बाबत.**

**संदर्भ :-** १) उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णयक्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/ उदयोग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६.

२) उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भांखस-२०२१/प्र.क्र.८/उद्योग-दिनांक ०७ मे, २०२१.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार या संस्थेतील शरीररचना शास्त्र विभागाकरिता आवश्यक असणारी साधनसामुग्री तातडीने खरेदीसाठी विहीत पध्दतीने दरपत्रक प्रक्रिया करुन दरपत्रक मोहोरबंद लिफाफे मागविण्यात येत आहे. दरपत्रक धारक या कार्यालयास मागणी केलेलया साधनसामुग्री व इतर अनुषंगिक बाबी पुरवठा करण्यास इच्छुक असल्यास विर्निष्टानुसार आपला दरपत्रक मोहोरबंद लिफाफा विहीत मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

| अ.क्रं. | साधनसामुग्रीचे नाव | नगसंख्या |
|---|---|---|
| १. | Bone Set | 01 |
| २. | Disarticulated Bone Set | 01 |

**अ.क्र.** **महत्वाच्या अटी व शर्ती**

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दिनांक 18 /०१/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही /ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सूचना फलक/संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्र मोहोरबंद लिफाफा **"अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार"** यांचे नावे विहितमुदतीत कार्यालयास सादर करावा.त्याचप्रमाणे लिफाफ्यावर डाव्या बाजूस **"दरपत्रक"**असे नमूद करावे. लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमूद असणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही दिनांक 20 /०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मा.अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावे.

५) दरपत्रकातील दर हे दिनांक 20/०१/२०२५ पर्यंत ग्राह्य राहतील. करीता आपणास ग्राह्य दरानेच वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. दरत्रक ग्राहय कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचा राहील.

CamScanner

६) प्रस्तावित दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तुंचा दर्जा/गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७) रसायने, काचसामान व इतर अनुषंगिक बाबी किंगत, जीएसटी कर व एकूण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८) दरपत्रक गोहोरबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज (Document) :- अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.

१) दुकानाचा परवाना/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र ,
२) पॅन कार्डची प्रत,
३) जी.एस.टी. प्रमाणपत्र,
४) आयकर विवरणपत्र
५) अन्न व औषध पुरवठा प्रमाणपत्र

९) **पुरवठा (Delivery) :-** पुरवठा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसात पुरवठा करण्यात यावा. सदर पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार सेवेचा पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत समाधानकारक व विनिर्दिष्ठेनुसार साहित्य पुरवठा न केल्यास द्वितीय न्युनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) **देयकाची अदायगी :-** वस्तू प्राप्त झाल्यानंतर संबधित पुरवठादारास उपलब्ध अनुदानानुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. यशस्वी दरपत्रकधारकास आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीमूळे देयक अदा करण्यास विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही.

११) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार) यांनी राखून ठेवलेले आहेत.

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**नंदुरबार**

प्रत:- १) कार्यालयाचे सूचना फलक.
२) Online Website, GMC, Nandurbar.

CamScanner